# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ०३.०९.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि ०२/०९/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ८६ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ४९,४००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत दि.०२/०९/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे वसमत शहर येथे ०१ ठिकाणी छापा टाकुन आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण ३,०१०/—रू माल जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**चोरी :—**दिनांक ०२/०९/२०२२ रोजी फिर्यादी विनोद केशवराव जाधव रा.जोडतळा ता.जि. हिंगोली ह.मु. रामकृष्ण पार्क बळसोड हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे बासंबा येथे कलम ३९४,५११ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.०२.०९.२२ रोजी चे ०२:३० ते ०३:१५ वा चे सुमारास फिर्यादीचे राहते घरी व गावतील ईतर पाच घरी मौजे जोडतळा येथे यातील आरोपीतांनी फिर्यादीचे व गावातील इतर लोकांचे घराच्या कडी कोंडा कुलुप तोंडुन घरात प्रवेश करून रोख रक्कम व सोन्याचे दागीने असा एकुण ५३,५०० रू माल चोरून नेला व फिर्यादीने आरोपीला पकडले असता आरोपीने फिर्यादीचे डोक्यात दगड मारून जख्मी करून पळुन गेले तसेच गावातील इतर दोन साक्षीदार यांचे घराचे कडीकोडा तोडुन चोरी करण्याचा प्रयत्न केला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात बासंबा पोलीस तपास करित आहेत.

दिनांक ०२/०९/२०२२ रोजी फिर्यादी चांदु देविदास सुर्यवंशी रा.चिखली ता.कळमनुरी जि.हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे आ.बाळापुर येथे कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.२७.०८.२२ रोजी चे १८:०० ते ३०.०८.२२ रोजी चे १०:०० वाचे दरम्याण वेळ नक्की माहिति नाही मौजे चिखली शिवारातील शेतात अज्ञात अरोपीनें फिर्यादीचे शेतातील विहरीवर असलेले ३ एच.पी.चा सौर पंप चोरून नेला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात आ.बाळापुर पोलीस तपास करित आहेत.

**फसवणुक** :— दिनांक ०२/०९/२०२२ रोजी फिर्यादी अशिषकुमार अशोककुमार भराडिया वय ३३ वर्ष व्य.नौकरी रा.वजीराबाद नांदेड ता.जि.नांदेड यांचे फिर्यादी वरून पोस्टे वसमत शहर येथे कलम ४२०,३४ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.१७.०२.२२ रोजी चे ते २६.०३.२२ रोजी वेळ नक्की माहिति नाही वसमत येथे आरोपीतांनी संगणमत करून बॅकेकडे तारण म्हणुन गहण ठेवलेली स्थावर मालमत्ता परस्पर विक्री करून शासनाची व फिर्यादीची फसवणुक केली म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात वसमत शहर पोलीस तपास करित आहेत.